जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 JAN 2019
पुण्यनगरी



कोल्हापूर : विद्यापीठात जागतिक ब्रेल दिवसानिमित्त 'दिव्यांग हक्क कायदा' या विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी रोपट्यास पाणी घालताना डॉ. राजेंद्र हिरेमठ. सोबत नसीमा हुरजूक व इतर.

# दिव्यांगांकडे सहायकाच्या भूमिकेतून पाहणे आवश्यक

## - डॉ. राजेंद्र हिरेमठ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शैक्षणिक, प्रशासकीय, क्रीडा, सांस्कृतिक यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये दिव्यांगांनी अत्यंत उंच भरारी घेतलेली आहे. त्यांच्याकडे सहानुभूतीने न पाहता सहायकाची भूमिका निभावण्याचे समाजाने ठरविल्यास दिव्यांग देश घडविण्यामध्ये निश्‍चितपणे हातभार लावतील, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र-समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यूजीसी स्कीम फॉर पर्सन विथ डिसेबल आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ब्रेल दिवसानिमित्त 'दिव्यांग हक्क कायदा' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हिरेमठ बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर होते.

हेल्पर्सच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक म्हणाल्या, दिव्यागांना कायद्याने प्राप्त झालेले हक्क सर्वच क्षेत्रांमध्ये अंमलात आणले जावेत, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. 'गगनाला पंख नवे' व 'दिव्यांगज' ही लघुचित्रफीत दाखविण्यात आली. डॉ. अंजली निगवेकर यांची संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

सकाळ



कोल्हापूर : संचालक डॉ. अंजली निगवेकर यांचा सत्कार झाला.

## लुई ब्रेल यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** दि नॅशनल असोसिएशन ऑफ ब्लाईंडतर्फे (नॅब) लुई ब्रेल यांची जयंती झाली. प्रतिमा पूजन झाले. संचालक डॉ. अंजली निगवेकर यांची शिवाजी विद्यापीठाच्या संगीत विभागप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल सत्कार झाला. यावेळी रोबो रायटर तयार करणारे धनेश बोरा यांच्यासह संस्थाध्यक्ष डॉ. मुरलीधर डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. विजय रेळेकर यांनी आभार मानले. डॉ. मीना डोंगरे यांनी सूत्रसंचालन केले. केरबा हंडे, ॲड. उदय शिरगोपीकर, शिवानंद पिसे उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
08/01/2019 Page No. 5

या महामॅरेथॉन-मध्ये सहभागी



झालेल्या आबाल-वृद्धांमध्ये एक वेगळी ऊर्जा आणि नवचैतन्य पाहायला मिळाले. आरोग्याबाबत सजग करणारा 'लोकमत'चा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. त्यातून एक नवी आरोग्यसंस्कृती रुजण्यास मदत होईल. 'एनएसएस'च्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाचे या उपक्रमाला नेहमीच पाठबळ राहील.

**- डॉ. डी. के. गायकवाड,**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,
शिवाजी विद्यापीठ.